नोंदणी डाकेने/पोचपावती देय.

क्रमांक:स्लाएनडी-२६७८/११९०९/प्र.क्र.३३७[ग९] / ज-३.

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १६ नोव्हेंबर, १९८९

विषय:- जमीन-मुंबई उपनगर जिल्हा
वर्सोवा येथील भूखंड क्र. २६, स.क्र. ८२
प्रो. एम. एम. गोभाई यांना दिलेल्या भाडेपट्टयाची
मुदत वाढवून देण्याबाबत...

थापन:-

अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांच्या वरील विषयाच्या क्र. सी/कार्यासन-१/जमीन/सीआर-२५, दिनांक २९ मे, १९८६ च्या पत्राने संपणाऱ्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने त्यांना विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचे मला आदेश आहेत की, वर्सोवा येथील स.नं. ८२ मधील भूखंड क्र. २६ मधील ३५७६ चौ.मी. जमीन प्रो. गोभाई यांना भाडेपट्टयाने देण्यात आलेली होती. त्या भाडेपट्टयाची मुदत दिनांक ३० एप्रिल १९३८ रोजी संपलेली आहे. तथापि सदर भाडेपट्टयाची मुदत दिनांक १ मे १९३८ पासून पुढे दिनांक ३० एप्रिल २००१ पर्यंत पुढील अटी व शर्तीवर वाढवून देण्यास आता शासनाने मंजुरी दिलेली आहे :-

[अ] भाडेपट्टयाचे नुतनीकरण करतांना त्याची मुदत पुढीलप्रमाणे राहील :-

[एक] पहिली मुदत दि. १.५.१९३८ ते ३०.४.१९७१ या कालावधीसाठी ३३ वर्षाची राहिल; व

[दोन] दुसरी मुदत दिनांक १/५/१९७१ ते ३०.४.२००१ या कालावधीसाठी ३० वर्षाची राहील.

[ब] भाडेपट्टयाच्या कालावधीमध्ये शासनाच्या भाडेपट्टया-च्या दराबाबतच्या स्थायी आदेशांना अनुसरून पुढीलप्रमाणे भाडेपट्टा निश्चित करण्यात यावे.

[एक] दिनांक १.५.१९३८ ते २.११.१९६९ या मुदतीसाठी दिनांक १.५.१९३८ रोजी अस्तित्वात असलेल्या पूर्ण बाजारमूल्याच्या ५ टक्के [पाच टक्केप्रमाणे].

[दोन] दिनांक ३.११.१९६९ ते ३०.४.१९७१ या मुदतीसाठी दिनांक ३.११.१९६९ रोजी अस्तित्वात असलेल्या पूर्ण बाजारमूल्याच्या ६१/२ [ताडेसहा टक्के प्रमाणे]

....२/-

Scanned by CamScanner

[तीन] दिनांक १.५.१९७१ ते १५.५.१९७८ या मुदतीसाठी दिनांक १.५.१९७१ रोजी अस्तित्वात असलेल्या पूर्ण बाजारमूल्याच्या ६½ टक्के [साडेसहा टक्के] प्रमाणे.

[चार] दिनांक १६.५.१९७८ पासून पुढील संपूर्ण कालावधीसाठी दिनांक १६.५.१९७८ रोजी अस्तित्वात असलेल्या पूर्ण बाजारमूल्याच्या ८% [आठ टक्के] प्रमाणे.

[पाच] दिनांक १६.५.१९७८ रोजी निश्चित केलेल्या भाडयाच्या दराचे प्रत्येक १० वर्षांनी पुनर्विलोकन करण्यात येऊन त्याप्रमाणे भाडयाच्या रकमेत सुधारणा करण्यात यावी. तसेच या दरात शासनाने भविष्यात बदल केल्यास त्याप्रमाणे सुधारीत भाडयाची रक्कम वसूल करण्यात यावी.

[सहा] भाडयाची रक्कम निश्चित करण्यासाठी जमिनीचे पूर्ण बाजारमूल्य, सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई यांच्या-मार्फत निर्धारित करून घ्यावे.

[क] वरील [ब] मध्ये नमूद केलेल्या मुदतीत निरनिराळ्या दराने आकारावयाच्या भाडेपट्टयाच्या रकमेवर जर ती रक्कम श्री. गोभाई यांनी भरणा केली नसेल तर अनुक्रमे ५ टक्के ६½ टक्के व ८ टक्के दराने व्याज आकारून त्यामधून श्री. गोभाई यांनी सन १९७३ पर्यंत अथवा त्यानंतर भरलेली रक्कम वजाती करून शिल्लक राहिलेली सर्व रक्कम त्यांचेकडून वसूल करावी व त्यांनी ती न भरल्यास ती रक्कम जमीन महसूलाची थकबाकी म्हणून त्यांच्याकडून वसूल करावी.

[ड] श्री. गोभाई यांनी सदर जमिनीवरील झोपडपट्टीवासीयांना त्यांच्या योजनेत समावून घेणे किंवा पर्यायी जागा देणे आवश्यक राहील, तेव्हा श्री. गोभाई यांनी प्रश्नाधीन प्लॉट क्र. २६[वर्सोवा] येथील असलेल्या झोपडपट्टीवासीयांचे शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे, पुनर्वसनास पात्र ठरणाऱ्या झोपड-पट्टीवासियांचे पुनर्वसन केल्याशिवाय व त्यांची संमती घेतल्याशिवाय त्यांना या जमिनीचा विकास करता येणार नाही.

[इ] सदर जमिनीबाबत जर नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या तरतुदी लागू असतील तर त्या कायद्याचे अधिग्रहीतांना पालन करावे लागेल.



Scanned by CamScanner

[ई] या खास अटीखेरीज नेहमीच्या शर्ती व अटी, अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटी व शर्ती बिनशर्त मान्य असल्याबाबत श्री. गोभाई यांनी स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र दिल्यानंतर व भुईभाड्याची होणारी एकूण देय रक्कम व्याजासह अधिग्रहीतांनी भरल्यानंतर भाडेपट्टयाचा नवीन करारनामा करुन घेतल्यावर दिनांक १. ५. १९३८ पासून पुढे भाडेपट्टयाचे नुतनीकरण श्री. गोभाई यांच्याबाबतीत झाले आहे असे समजण्यात येईल.

२. प्रकरणाच्या कागदपत्रांच्या ४ संचिका सोबत परत करण्यात येत आहेत.

३. हे आदेश गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग आणि वित्त विभाग [अनौपचारिक संदर्भ क्र. सोआर-२२३/व्यय-९, दिनांक १ मार्च १९८९] यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[जयंत व. दिवाण]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

सोबत:-कागदपत्रांच्या ४ संचिका.

प्रति,
अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.

प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषित:-

आयुक्त, कोकण विभाग, कोकणभवन, नवी मुंबई.

उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश कैसर-ए-हिंद बिल्डींग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई.

सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई उपनगर जिल्हा.

महालेखाकार, महाराष्ट्र राज्य,-१ मुंबई.

महालेखाकार, महाराष्ट्र राज्य,- २ नागपूर.

महालेखाकार, महाराष्ट्र राज्य-१[लेखा व अनुज्ञेयता] मुंबई.

महालेखाकार, महाराष्ट्र राज्य-२[लेखा व अनुज्ञेयता]नागपूर.

गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग.

वित्त विभाग[व्यय-९]

निवड नस्ती, ज-३ कार्यासन, म. व व. वि.

OFFICE OF THE
...TIONAL COLLECTOR
...AY SUBURBAN DIST.
1 NOV 1989

Scanned by CamScanner